नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 27/01/2021 (बुधवार)
(दुपार)

---

## अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 3 कि. मी. मौजा गणेशपुर येथे दिनांक 26/01/2021 चे 18.00 वा. ते 18.15 वा. दरम्यान फिर्यादी स्टॉफसह पो.स्टे. परीसरात पेट्रोलींग करीत असता मुखबीर द्वारे खबर मिळाली की, गणेशपुर चौकात एक इसम स्वता:जवळ चाकु बाळगून फिरत आहे. यावरून माहिती वरून आरोपी नामे– मोहीत उर्फ गोली मुरारी बडोले, वय 21 वर्ष, रा. गणेशपुर ता.हिंगणा जि.नागपुर यास ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या जवळुन तलवारी सारखा चाकु मिळुन आला. सदर आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने चाकु घेवुन फिरतांना मिळुन आला.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोहवा शैलेश नागरे, पो.स्टे. एमआयडीसी बोरी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार शैलेश नागरे 7743919809 हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर